# मुंबई विद्यापीठ

क्र. आय.आय.एल/आयसीसी/२०२४-२५/०५

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठातील सर्व विभाग आणि संलग्न महाविद्यालये यांना या परिपत्रकान्वये सूचित करण्यात येते की, मुंबई विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ मार्फत MU-IDEAS Foundation Incubation Center व स्टार्टअप क्लिनिक (Startup Clinic) यांच्या संयुक्त विद्यमाने "आयडियाथॉन २.०" या स्पर्ध्येचे आयोजन करण्यात येत आहे.

"आयडियाथॉन २.०" या स्पर्धेच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना पाठबळ देऊन स्टार्ट-अप मध्ये रुपांतर केले जाणार आहे. या उपक्रमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचे विद्यापीठाच्या परिक्षेत्रात स्थापन करण्यात आलेल्या ४७ स्टार्ट-अप क्लिनिकच्या माध्यमातून पहिल्या स्तरावर सादरीकरण होणार आहे व त्यातून निवडक प्रस्तावांचे अंतिम सादरीकरण होणार असुन त्यातुन उत्कृष्ठ ठरणाऱ्या विविध नवउद्योजकांच्या नाविण्यपूर्ण कल्पनांचे व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य उपक्रमांमध्ये रुपांतर करण्यास प्रोत्साहन आणि पाठबळ दिले जाणार आहे. सदर स्पर्धेत विजयी स्पर्धकांना खालील प्रमाणे बक्षिस वितरण केले जाईल.

| | |
|---|---|
| **प्रथम क्रमांक** | **१०,०००/-** |
| **व्दितीय क्रमांक** | **७,०००/-** |
| **तृतीय क्रमांक** | **५,०००/-** |

"आयडियाथॉन २.०" या स्पर्ध्येमध्ये सहभागी होण्यासाठी https://tinyurl.com/Ideathon4u या लिंकचा वापर करता येईल.

**सदर स्पर्धमध्ये सहभागी होण्यासाठी अंतिम दिनांक १४/११/२०२४ होती परंतू स्पर्धकांनी केलेल्या मागणीनुसार स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी अंतिम दिनांक ३०/११/२०२४ पर्यंत वाढविण्यात येत आहे.**

Sd/-

**१४ नोव्हेंबर, २०२४**
**मुंबई – ४०० ०९८**

**प्रा. डॉ. सचिन श्या. लड्डा**
**संचालक**
**नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ**